विकास योजना / प्रादेशिक योजना
नकाशे, अहवाल शासनास सादर
करताना अनुसरावयाची कार्यपध्दती

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्र.टिपीएस-११२०/प्र.क्र.२०/२०२०/नवि-९**
**मंत्रालय, मुंबई-३२.**
**दिनांक : ०४ फेब्रुवारी, २०२०**

**परिपत्रक**

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे उक्त अधिनियम असे नमुद केले आहे) च्या कलम ३१(१) अन्वये शासनाकडुन विकास योजनेस मंजूरी प्रदान केल्यानंतर व कलम १५ अन्वये प्रादेशिक योजनेस मंजुरी प्रदान केल्यानंतर, शासन मंजुरीनुसार भागश: / पुनर्प्रसिध्द (ई.पी.) विकास योजना मंजुरीचे नकाशे, विकास योजना अहवाल तसेच प्रादेशिक योजना मंजुरीचे नकाशे, अहवाल तसेच मंजुर नगर रचना योजनेचे नकाशे, नियमावली इ. शासनास विहित मार्गाने अधिप्रमाणित करण्यासाठी सादर करण्यात येतात.

विविध विभागीय कार्यालयाकडुन शासनाकडे अधिप्रमाणित करण्यासाठी प्राप्त होणाऱ्या विकास योजनेच्या नकाशामध्ये काही ठिकाणी प्रारुप या शब्दाचा उल्लेख असुन तो खोडला जात आहे. तसेच काही ठिकाणी कलम ३० अन्वये सादर नकाशामध्ये दुरुस्ती दर्शवून त्याखाली कलम ३१(१) अन्वये मंजुर नकाशा असा उल्लेख असतो. याशिवाय शाखा कार्यालयाचे अधिकारी, विभागीय सह संचालक तसेच शासन स्तरावर सह सचिव तथा संचालक (नगर रचना) / उप सचिव तथा उप संचालक (नगर रचना) यांच्या स्वाक्षरीसाठी विशिष्ट जागा नकाशावर न ठेवल्यामुळे उपलब्ध त्या ठिकाणी स्वाक्षरी करावी लागते. या सर्वबाबींमुळे शासनास अधिप्रमाणित करण्यासाठी सादर नकाशांमध्ये एकसुत्रता नसल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहे. यामुळे सदरहु विकास योजना नकाशास मंजुरी प्रदान करताना उक्त बाबींवर उपाय योजनेसह त्यामध्ये एकसुत्रता आणण्याच्या दृष्टीने सूचना देणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे. या बाबींचा विचार करुन शासन या परिपत्रकाद्वारे पुढील प्रमाणे सूचना देत आहे.

**शासन परिपत्रक:-**

उक्त परिच्छेदात नमुद केल्यानुसार भागश: मंजुर / सारभूत स्वरुपाचे फेरबदलाबाबत पुनर्प्रसिध्द करावयाचे नकाशे / पुनर्प्रसिध्द विकास योजनेस मंजुरीबाबतचे तसेच प्रादेशिक योजना मंजुरीचे नकाशे व विकास योजना / प्रादेशिक योजना, अहवाल तसेच मंजुर नगर रचना योजनेचे नकाशे, नियमावली इ. शासनाकडे अधिप्रमाणित करण्यासाठी सादर करताना खालील प्रमाणे कार्यवाही अनुसरण्यात यावी.

१. भागश: मंजुरी नकाशावर प्रारुप या शब्दाचा उल्लेख करण्यात येऊ नये. तसेच कलम ३० अन्वये सादर नकाशा खोडुन त्याखाली कलम ३१(१) अन्वये मंजुर नकाशा ऐवजी फक्त कलम ३१(१) अन्वये मंजुर नकाशा असे नमुद करण्यात यावे.

२. भागश: मंजुरी नकाशावर मुख्याधिकारी, नगर परिषद व अध्यक्ष, नगर परिषद यांचे पदनाम लिहुन त्याठिकाणी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. याप्रमाणे नगर रचना अधिकारी यांचे पदनाम व नांव लिहुन त्याठिकाणी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्या स्वाक्षरीच्यावर नकाशाची वैधानिक स्थिती संदर्भातील नोंद अत्यावश्यक आहे. उदा. PLAN PUBLISHED U/s 26 of MRTP Act किंवा PLAN SUBMITTED U/s 30 of MRTP Act.

३. विकास योजना मंजुरीचे अधिप्रमाणित करावयाच्या नकाशांवर सदर प्रमाणित नमुन्यात योग्य जागेवर शासनाच्या सह सचिव / उप सचिव यांचे स्वाक्षरीसाठी आणि सील उमटविण्यासाठी योग्य आकाराचा रकाना कोरा सोडणे आवश्यक आहे. सदर रकान्याच्या वर PLAN SANCTIONED U/s .............. of MRTP Act vide Government Notification No. ......... नमुद करणे आवश्यक आहे.

४. प्रादेशिक योजना व नगर रचना योजना नकाशा संदर्भात ही वरील परिच्छेद क्र. ३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५. भागश: मंजुरीच्या तसेच पुनर्प्रसिध्द विकास योजना मंजुरीच्या नकाशावर अधिसूचनेचे / शुध्दिपत्रकाचे / पुरकपत्राचे तपशिल नमुद करणे आवश्यक आहे.

६. विकास योजना / प्रादेशिक योजना नकाशा अधिप्रमाणित करण्यासाठी सादर करताना त्यामध्ये पुनर्प्रसिध्द विकास योजनेचा / सारभूत स्वरुपाच्या फेरबदलाचा तसेच भागश: विकास योजना मंजुरीनुसार आवश्यक त्या रकान्यात योग्य त्या रंगाने बदल दर्शविण्यात यावे व अधिप्रमाणित करावयाच्या अहवालावर प्रमाणित नमुन्यात योग्य जागेवर शासनाच्या सह सचिव / उप सचिव यांचे स्वाक्षरीसाठी आणि सील उमटविण्यासाठी जागा सोडणे आवश्यक आहे. सदर स्वाक्षरीच्यावर SANCTIONED U/s ................. of MRTP Act नमुद करणे आवश्यक आहे.

(श्रीरंग लांडगे)
**सह सचिव तथा संचालक**
**महाराष्ट्र शासन**

**<u>प्रत माहितीसाठी:-</u>**

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
२) मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव.
३) अपर मुख्य सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सदर शासन परिपत्रक नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharshta.gov.in या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करण्यात यावे.
५) सह सचिव तथा संचालक (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
७) उप सचिव तथा उप संचालक (नगर रचना) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**<u>प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी:-</u>**

१) विभागीय आयुक्त, पुणे / कोकण / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती विभाग.
२) महानगर आयुक्त, मुंबई / नाशिक / नागपूर / पुणे / औरंगाबाद - महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
३) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
४) सह संचालक, नगररचना, अंमलबजावणी कक्ष, पुणे / मुल्यांकन, पुणे.
५) सह संचालक, नगर रचना, विभागीय कार्यालय (कोकण / पुणे / नाशिक/ नागपूर/ औरंगाबाद / अमरावती विभाग)
सदर शासन परिपत्रकाची प्रत आपल्या विभागातील व अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका / नगर परिषदा/ नगर पंचायती तसेच सर्व शाखा कार्यालयास पुरविण्यात येवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
६) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
सदर शासन परिपत्रक शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे.
७) अवर सचिव, नवि-११ / नवि-१३/ नवि-३०.
८) कक्ष अधिकारी, नवि-१२.
९) निवडनस्ती (नवि-९)

C:\२०१४-२०२०\Paripatrak\परिपत्रक.docx